## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## शोध समिती "कुलगुरू" पदासाठी अर्ज मागवीत आहे

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एक प्रतिष्ठित विद्यापीठ असून त्याची स्थापना दिनांक २० आक्टोंबर १९६९ रोजी विदर्भातील कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाच्या क्षेत्रातील भरीव योगदानासाठी करण्यात आली.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये विदर्भातील ११ जिल्ह्यांचा समावेश असून त्यामध्ये अकोला, बुलढाणा, वाशीम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि नागपुर या जिल्ह्यांचा अंतर्भाव होतो. विद्यापीठाचे मुख्यालय अकोला येथे असून विद्यापीठाचे ०१ पदव्युत्तर महाविद्यालय, ०९ घटक महाविद्यालये आणि ०२ अनुदानित तर २६ विना अनुदानित संलग्न महाविद्यालये आहेत. यांच्याद्वारे कृषि क्षेत्रातील पदवी, पदव्युत्तर आणि आचार्य पदवी अभ्यासक्रम शिकवले जातात. तसेच ०८ घटक व ०३ अनुदानित आणि ४९ विना अनुदानित कृषि तंत्र विद्यालयामध्ये कृषि पदविका अभ्यासक्रम शिकविला जातो. विद्यापीठाच्या विविध कृषि हवामान क्षेत्रामध्ये कार्यरत १९ संशोधन केंद्रांद्वारे संशोधनाचे तर ०७ कृषि विज्ञान केंद्रांमार्फत विस्तार शिक्षणाचे कार्य पार पडले जाते.

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील तरतुदींनुसार कुलगुरूंची निवड पारदर्शी तसेच वस्तुनिष्ठ कार्यपद्धतीचा अवलंब करून या पदावर उच्चविद्याविभूषित, नेतृत्वगुण व उच्च दर्जाचा प्रशासक अशी पात्रता असणाऱ्या तसेच विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या हितासाठी समर्थ नेतृत्वगुणयुक्त सक्षम असेल अश्या व्यक्तीची "कुलगुरू" या पदासाठी निवड करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपाल मोहोदय हे विद्यापीठाचे कुलपती असून त्यांनी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी सुयोग्य नावाची शिफारस करण्यासाठी त्रिसदस्यीय शोध समितीची स्थापना केली आहे.

महाराष्ट्र शासन आदेश दिनांक २१.०७.२०१०,दि.०५.०७.२०११, दि.०६.०७.२०१५, दि.१४.०३.२०१८ आणि दि.१३.१०.२०२० मधिल तरतुदींनुसार जे उमेदवार कुलगुरू या पदाची पात्रता आणि अनुभव धारण करीत आहेत, अश्या सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञांकडून व ज्यांची कुलगुरू या सन्माननीय जबाबदारीच्या पदावर कार्य करण्याची इच्छा आहे, अश्या उमेदवारांकडून हि शोध समिती उमेदवारी अर्ज मागवीत आहे.

कुलगुरू या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक आर्हता, आवश्यक अनुभव आणि कौशल्ये व निपुणता याबाबतची तपशीलवार माहिती तसेच अर्जाचा नमुना इत्यादी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या www.pdkv.ac.inआणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या www.mcaer.orgया अधिकृत संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

इच्छुक उमेदवारांनी त्यांची शिक्षणिक पात्रता, अनुभव आणि त्यांच्या उपलब्धी इत्यादींची क्रमवार माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आवेदनाच्या प्रपत्रात भरावी. त्याचबरोबर उमेदवारांनी कुलगुरू या पदाकरिता आवश्यक पात्रता धारण करीत असल्याबाबतचा संक्षिप्त तपशील, विशेष कौशल्ये आणि क्षमता इत्यादी माहिती दोन पानी समर्थन, विद्यापीठाकरिता दोन पानी भविष्यलक्षी योजना (Vision) आवश्यक त्या सहपत्रासह उपलब्ध करून द्यावे. तसेच उमेदवाराच्या कार्याविषयी सुपरिचित असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नवे संपर्क तपशीलासह देण्यात यावा जेणेकरून शोध समितीस सुयोग्य उमेदवाराची पात्रता / योग्यता निश्चित करणे सोपे होईल. संस्थासुद्धा सुयोग्य उमेदवारांची नावे सुचवू शकतात.

शोध समितीने डॉ. नरोत्तम प्रसाद साहू यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज विहित नमुन्यात सर्व आवश्यक कागदपत्रांसह चार प्रतीत शोध समितीने नेमलेले नोडल अधिकारी यांचेकडे दिनांक २७ जून २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचतील अश्या पद्धतीने खालील पत्त्यावर पाठवावीत. उमेदवारांनी ते सध्या कार्यरत असलेल्या विभागाचे / संस्थेचे "ना हरकत प्रमाणपत्र" तसेच उमेदवाराची विभाग / संस्थेद्वारे विभागीय चौकशी सुरु नसल्याचे किंवा प्रलंबित नसल्याचे प्रमाणपत्र जोडावे.

पाकिटावर समोरच्या बाजूस "Application for the Post of Vice-Chancellor, Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola." असे ठळक अक्षरात लिहिणे आवश्यक आहे.

उमेदवार आपल्या अर्जाची / नामांकनाची प्रत (चार प्रतीत) सोफ्ट प्रतीसह विहित मुदतीच्या नोडल अधिकारी याचेकडे खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवावीत. अर्जाची अंतिम मुदत झाल्यानंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही. उमेदवाराचा अर्ज पोस्ट / कुरिअरने खालील पत्त्यावर विलंबाने प्राप्त झाल्यास शोध समिती जबाबदार राहणार नाही.

**नोडल अधिकारी यांचा तपशील :-**

- नाव : डॉ. नरोत्तम प्रसाद साहू
- पत्रव्यवहाराचा पत्ता : संयुक्त निदेशक

  भा.कृ.अनु.प. –केंद्रीय मात्स्यिकी शिक्षा संस्थान,

  पंचमार्ग, ऑफ यारी रोड, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम),

  मुंबई – ४०००६१.

- इ-मेल : nodalpdkvakola@gmail.com
- मोबाईल क्र. : ९८६९१२०६२७.

आवश्यकता भासल्यास शोध समिती निवड सूचीतील उमेदवारांना विचारांचे आदान प्रदान करण्याकरिता आमंत्रित करील.

दिनांक : २८.०५.२०२२

अध्यक्ष,
शोध समिती